# तहसिल कार्यालय औरंगाबाद

## जिल्हाधिकारी कार्यालय मागे फाजलपुरा, औरंगाबाद

फोन नं ०२४०-२३३४७२८ E-Mail tahsildarabad@gmail.com

जा.क्र.२०१९/जमा-२/एनए-परि-ब-सनद/प्र.क्रं-३६ दिनांक १८/१२/२०१९

वाचा :-

१.शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक : एनएपी-२०१६/प्र.क्र.७/टी-१, दिनांक २२ जानेवारी २०१६.

२.सहयोगी नियोजनकार, नवीन शहर, सिडको, औरंगाबाद यांचे पत्र क्रं. सिडको / टिपीओ / ऐएफऐ-टीएलपी/२०१९/७२ दि. २८/०८/२०१९.

३.अर्जदार पुष्पानंद इन्फ्रास्ट्रक्चर सिल्लोड तर्फे भागीदार श्रीमती. पुष्पा नंदकिशोर सहारे रा. खडकेश्वर, मालखरे विहार, ता.जि.औरंगाबाद यांचा अर्ज दि. ११/०९/२०१९.

### परिशिष्ट "ब"

### महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम-४२ अ मधील तरतुदींन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम / विकास परवानगी दिली आहे, अशा जमिनीच्या भोगवटदारास द्यावयाच्या सनदेचा नमुना.

ज्याअर्थी, जिल्हा औरंगाबाद तालुका औरंगाबाद मौजे सावंगी येथील सर्व्हे क्र./गट नं. /न.भू.क्र. १७२ (पैकी) मधील क्षेत्रफळ ३१००.०० चौ.मी. या जमिनीच्या भोगवटादाराने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२-अ च्या तरतुदींन्वये निवासी अकृषिक प्रयोजनासाठी सदर जमिनीचा विकास करण्यास सहयोगी नियोजनकार, नवीन शहर, सिडको, औरंगाबाद यांचे पत्र क्रं. सिडको/टिपीओ/ऐएफऐ-टीएलपी/२०१९/७२ दि. २८/०८/२०१९ अन्वये तात्पुरती मंजुरी प्राप्त आहे, ज्या संबंधी नियोजन प्राधिकरणाने मंजूर केलेला नकाशा या सनदेसोबत संलग्न आहे.

ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या भोगवटादाराने शासनाला, उक्त संहितेच्या कलम ४७-अ नुसार देय रुपांतरण कराची व वर नमूद अकृषिक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम **रुपये १६,७४०/- (अक्षरी सोळा हजार सातशे चाळीस रुपये फक्त) चालान क्रं GRN MH००९४७४७५०२०१९२०M** चालानद्वारे दिनांक १६/१२/२०१९ रोजी भरणा केला आहे.

त्याअर्थी आता, उक्त संहितेमधील तरतुदीच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना आणि खालील शर्तींना अधिन राहून उपरोक्त जमिनीच्या भोगवटादारास सदर नियोजन प्राधिकाऱ्याच्या वर उल्लेखित विकास / बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमिनीवर अनुज्ञेय करण्यात आलेल्या अकृषिक वापरापोटी उक्त संहितेच्या कलम ४२-अ अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

१. आकारणी : उक्त जमिनीचा भोगवटादार उक्त जमिनीच्या संबंधात या अगोदर वसुली योग्य असलेल्या आकारणी ऐवजी वर उल्लेखित विकास / बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासून दि. ३१ जुलै २०२० रोजी संपणाऱ्या हमीच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी **रु. ०.९० पैसे** प्रती चौ.मी. या दराने परिगणित होणारी वार्षिक आकारणी देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर, उक्त संहिते अन्वये जिल्हाधिकाऱ्याकडून, वेळोवेळी निश्चित करण्यात येईल, अशी सुधारित आकारणी देईल.

२. उक्त जमिनीचा भोगवटादार उक्त जमिनीवर वसुली योग्य असलेले सर्व कर, दर आणि उपकर भरील.

३. वरीलप्रमाणे मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मंजूरीशिवाय कोणताही बदल करु नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने सदर जमिनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती, असा बदल नियोजन प्राधिकरणाकडून मंजूर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे भोगवटादारावर बंधनकारक राहील.

४. उक्त जमिनीच्या भोगवटादाराने पूर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास जिल्हाधिकाऱ्यास, उक्त संहितेच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींअन्वये जी भरण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम ३२९ च्या पोट कलम (२) च्या अधीनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमीन भोगवटादार याच्या वहिवाटीत असण्याचे चालू ठेवता येईल.

याची साक्ष म्हणून तहसिलदार औरंगाबाद या ठिकाणी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नीने स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुध्दा दिनांक १८/१२/२०१९ रोजी त्याची स्वाक्षरी येथे केलेली आहे.

Sau Pushpa N Sahare

पुष्पानंद इन्फ्रास्ट्रक्चर सिल्लोड तर्फे भागीदार
श्रीमती. पुष्पा नंदकिशोर सहारे

(डॉ. कृष्णा कानगुले)
तहसिलदार औरंगाबाद

(साक्षीदारांच्या स्वाक्ष-या)
१) श्री. रत्नाकर जगन्नाथ शिंदे
२) श्रीमती संगिता दिपक बिरारे

आम्ही जाहीर करतो की, या सनदेवर स्वत: अर्जदार पुष्पानंद इन्फ्रास्ट्रक्चर सिल्लोड तर्फे भागीदार श्रीमती. पुष्पा नंदकिशोर सहारे यांनी आमच्या समक्ष स्वाक्षरी केलेली आहे.

**::प्रतिलीपी::**

१.मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
२.मा.उपविभागीय औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
३.वरिष्ट नियोजनकार, सिडको, नविन शहर, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
४.मंडळ अधिकारी चौका / तलाठी साझा चौका ता.जि.औरंगाबाद यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
५.संबंधितास अनुपालनास्तव.

(डॉ. कृष्णा कानगुले)
तहसिलदार औरंगाबाद